प्रकरण चौथे

# *अर्जुन डांगळे यांचे वैचारिक वाङ्मय*

# प्रकरण चौथे

## *अर्जुन डांगळे यांचे वैचारिक वाङ्मय*

प्रस्तावना

अर्जुन डांगळे यांचे लेखसंग्रह

१. आंबेडकरी चळवळीचा इतिहास : आंबेडकरी चळवळीचे अंतरंग

२. धर्मनिरपेक्ष प्रागतिक विचारांची मांडणी : निळे अधोरेखित

३. १९७० नंतरच्या दलित चळवळीचा दस्ताऐवज : दलित विद्रोह

४. जीवनरूपी समरागणातील योद्ध्यांचे स्मरण : मैदानातील माणसे

अर्जुन डांगळे यांचे संपादन कार्य

१. दलित साहित्य : एक अभ्यास

२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ

३. लोकशाहीर आण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय

४. कर्मवीर दादासाहेब गायकवाड काल आणि कर्तृत्व

समारोप

## प्रकरण चौथे

# *अर्जुन डांगळे यांचे वैचारिक वाङ्मय*

---

प्रस्तुत प्रकरणात अर्जुन डांगळे यांच्या वैचारिक लेखनाचा विचार करावयाचा आहे. त्यांची वैचारिक लेखनाची एकूण आठ पुस्तके आहेत. यामध्ये चार लेखसंग्रह व चार संपादनांचा समावेश आहे. *मैदानातील माणसे, आंबेडकरी चळवळीचे अंतरंग, निळे अधोरेखित व दलित विद्रोह* हे लेखसंग्रह तर *दलित साहित्य : एक अभ्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे : निवडक वाङ्मय व कर्मवीर दादासाहेब गायकवाड : काल आणि कर्तृत्व* ही त्यांची संपादने होत.

हे लेखन विविध स्वरूपाचे आहे. सामाजिक चळवळी व त्यास पोषक ठरलेल्या व्यक्तींच्या कार्याचे स्मरण तसेच दलित साहित्यासंबंधीचेही हे लेखन आहे. डांगळे यांच्या वैचारिक भूमिकेचे प्रकटीकरण याप्रकारच्या लेखातून व्यक्त झाले आहे. त्यांच्या एकूण वैचारिक साहित्याचे विचारसूत्र पहायचे झाल्यास त्यांचे *दलित चळवळीचे अंतरंग, दलित विद्रोह* आणि निळे अधोरखित या तीन लेखसंग्रहातून पहायला मिळते. साहित्य, समाज आणि चळवळीच्या अनुषंगाने त्यांनी तटस्थ भूमिकेतून लिहिलेले हे लेख आहेत.त्यांच्या या लेखनाचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

### १. आंबेडकरी चळवळीचा इतिहास : आंबेडकरी चळवळीचे अंतरंग

*आंबेडकरी चळवळीचे अंतरंग* हा लेखसंग्रह लोकवाङ्मयगृहाच्या वतीने जून २००१ मध्ये प्रकाशित करण्यात आला. या ग्रंथामध्ये एकूण २० लेख आहेत. डांगळे यांचे १९७४ ते १९९९ या कालखंडातील दलित चळवळीचे विविधांगी चितंन समाविष्ट आहे. त्यामध्ये लेख, मुलाखती व भाषणांचा समावेश आहे. डांगळे यांच्या एकूण वाङ्मयविषयीचे चिंतन, त्यांची साहित्यविषयक भूमिका याठिकाणी व्यक्त झालेली दिसून येते. सदर ग्रंथातील लेख *लोकसत्ता, मुबंई सकाळ, प्रबुद्ध भारत, आम्रपाली, सांज दिनांक*, *महानगर* या वर्तमानपत्र व नियतकालिकातून प्रसिद्ध झाले आहेत.

या ग्रंथात दोन मुलाखतीचा समावेश आहे. सुरुवातीला सचिन तासगांवकर यांनी घेतलेल्या मुलाखतीत डांगळे यांनी रिपब्लिकन पक्षाची वाटचाल व भूमिका विशद केली आहे. पक्षातील फूट, विस्तार मर्यादा, आदी प्रश्नांची चिकित्सा या मुलाखतीतून केली आहे. *दलितांची*

*एकजूट आवश्यक आहे* या लेखात समन्वयवादी फूटीला थारा न देता दलितांच्या एकजूटीच्या विचार मांडणीची व्यापक भूमिका विशद केली आहे. डांगळे यांच्या मते, दलितांची एकजूट आवश्यक आहे कारण

> *दलित जनता ही आर्थिक, सामाजिक विषमतेच्या वरवंट्याखाली भरडली जात असेल, जर सगळ्यांच्या जीवन-मरणाचे प्रश्न एकच असतील तर त्याविरूद्ध लढा देण्यासाठी एकजूट आवश्यक आहे.* (अर्जुन डांगळे : २००१ : ०९)

याप्रकारची सामाजिक मीमांसा केली आहे. राजकीय नेते स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी दलित जनतेत वाद निर्माण करत असतात. अशा वादाला बळी न पडता दलितांची व्यापक आघाडी बनविणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी दलितांची एकजूट असणे आवश्यक आहे. असा विचार ते मांडतात.

. अर्जुन डांगळे यांचे लेखन हे प्रतिक्रियावाद व अभिप्रायात्मक स्वरूपाचे आहे. दया पवार यांनी दिवाळी अंकात जो *दलित जाणीव* नावाचा लेख लिहिला होता. त्याला झणझणीत असे उत्तर डांगळेनी *दलित जाणीव छे? चिंतनाची उणीव* या लेखात दिले आहे. समीक्षक व एक चळवळीचा कार्यकर्ता म्हणून डांगळे यांनी याठिकाणी केलेले वक्तव्य अत्यंत मार्मिक व महत्त्वाचे वाटते. पवारांचा लेख वाचून दलित जाणीव होण्याऐवजी जी चिंतनाची उणीव भासली त्याचे सरळ विश्लेषण या लेखात आहे. दया पवार यांच्या लेखावरची ही प्रतिक्रिया आहे. त्याची दुसरी बाजू मांडण्याचा प्रयत्न आहे.

बाबासाहेब आंबेडकरांनी देशातील इतिहासाला नवे वळण देणारा जो *रिडल्स इन हिंदूइझम* हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथातील *रिडल्स ऑफ राम ॲन्ड कृष्णा* या भागावर महाराष्ट्र शासनाने बंदी आणली. ती बंदी डांगळेना महाराष्ट्राच्या बुद्धीवादी परंपरेची शोकांतिका वाटते. म्हणूनच त्यांनी *रिडल्स : बुद्धीवादाची शोंकातिका* असा लेख लिहिला आहे. लोकशाहीची मूल्ये, विचार स्वातंत्र्य आणि लेखन स्वातंत्र्य या सगळ्या मूल्यांचा विचार न करता आंबेडकरांसारख्या एका महापुरुषाच्या लिखाणावर शासनाने बंदी का घातली? याविषयी हा लेख लिहिला आहे.

> *राम आणि कृष्ण याच्यांसबंधी अनेक विचारवंतानी लिखाण केले आहे. परतुं त्यांच्या लिखाणावर बंदी न आणता व जातीयवादी शक्तींनी त्या ग्रंथाची होळी न करता बाबासाहेब आंबेडकर यांच्याच ग्रंथाची होळी का केली?* (अर्जुन डांगळे : २००१ : ४३)

हा विचार मांडतात. एका अर्थाने शासनाच्या दडपशाहीवरची ही प्रतिक्रिया आहे. शासनाची ही दडपशाही सामाजिक मूल्यऱ्हासाचाच प्रकार आहे. शासनाच्या या धोरणाचा निषेध म्हणून ही प्रतिक्रिया नोंदविली आहे.

प्रस्तुत लेखासंग्रहात *आंबेडकरी चळवळीचे तिसरे पर्व* हा महत्त्वपूर्ण असा लेख आहे. बाबासाहेब आणि दादासाहेबांच्यानतंर आंबेडकर चळवळ पुढे चालवण्याचे काम ॲड. प्रकाश आंबेडकरांनी कसे केले. याचा आढावा या लेखात घेतला आहे. पहिल्या दोन पर्वात शिवाशीव, मंदिरप्रवेश, विटाळ, जातीव्यवस्था हे चळवळीचे प्रश्न होते. परतुं तिसऱ्या पर्वात जातीयवादाला व धर्मांधतेला एक नवा परिमाण लाभले. जातीयवादाचा आविष्कार होऊन त्यातून जे सामाजिक हादरे बसू लागले त्या प्रश्नांचा आणि समस्यांचा विचार या चळवळीने केला आहे. भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना करून वेगवेगळी अधिवेशने भरवून आंबेडकर चळवळीने जी परिवर्तने घडवून आणली. त्या सर्व परिवर्तनाचा आलेख *आंबेडकरी चळवळीचे तिसरे पर्व* मधून डांगळे यांनी मांडला आहे. याशिवाय *ऐक्याच्या नाटकाला आता आंबेडकरी जनता फसणार नाही, संघाची दलितांशी जवळीक कशासाठी* आणि *एकविसाव्या शतकातील फुले-आंबेडकर साहित्य संस्कृती.* असेही काही लेख आहेत.

सदरच्या लेखसंग्रहात काही व्यक्तीचित्रणात्मक लेख लिहिलेले आहेत. त्यामध्ये *डॉ.म.ना.वानखेडे, शाहीर अण्णा भाऊ साठे, दादासाहेब गायकवाड* आणि *मी पाहिलेला दया.* असे एकूण चार लेख आहेत. या व्यक्तींच्या कार्याचा व वाङ्मयाच्या आढावा या लेखनात आहे. शेवटी १९९९ मध्ये राज्यस्तरीय आंबेडकरवादी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणातून आंबेडकरवादाबद्दलची आपली भूमिका स्पष्ट करताना *साहित्य आणि संस्कृती* संबंधीचे चिंतन सांगून मानवी जीवनाची सर्वांगे आणि त्याकडे आंबेडकरवादाचा बघण्याचा दृष्टिकोण स्पष्ट केला आहे. एकूणच सत्तरीनंतरच्या वीसेक दशकाचा सामाजिक, राजकीय घडामोडींचा आलेख ते आपल्यासमोर उभा करतात. यातून समाजवास्तव आणि राजकीय चळवळ यांच्या विश्लेषणावर भाष्य करतात.

### ***२. धर्मनिरपेक्ष प्रागतिक विचारांची मांडणी : निळे अधोरेखित***

प्रस्तुतचा लेखसंग्रह हा सहित प्रकाशनाच्यावतीने २००५ मध्ये प्रकाशित करण्यात आला. या संग्रहात एकूण वीस लेख आहेत. हे लेख *दैनिक महानगर भावकी* या साप्ताहिक सदरातून प्रसिद्ध झाले आहेत. या लेखसंग्रहातून त्यांनी सातत्याने बहुजनवादाची व संस्कृतीबद्दलची मांडणी केलेली दिसून येते. आपले विचार ठामपणे मांडत जाणे हे त्यांच्या लिखाणाचे वेगळेपण आहे. निळे अधोरेखित बद्दल गंगाधर पानतावणे म्हणतात,

*अर्जुन डांगळे हे आंबेडकर तत्त्वज्ञानाचे भाष्यकार आणि समाज-संस्कृतीचे मनस्वी अभ्यासक म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेत. प्रश्नांची मूलभूत मांडणी हा त्यांचा वैचारिक स्वभाव आहे. निर्भयता, साधारता, विवेकता आणि परखडपणा ही त्यांची लेखन आयुधे आहेत. दलित चळवळीचा विचार ते जितक्या गांभीर्याने करतात तितकाच विचार ते साहित्यक्षेत्रातील प्रदुषणांची वस्तुनिष्ठ मांडणी करतानाही करतात. आतंकवाद हा राष्ट्रीय प्रश्न आहे. परंतु धार्मिक आतंकवाद भारतीय जीवन उद्ध्वस्त करणारा आहे ह्याची साक्षेपी मांडणी करतात. गांधी-आंबेडकर वैचारिक समन्वय त्यांना अपरिहार्य वाटतो. जगातील मानवतेसाठी लढणाऱ्या पुरूषांची आणि त्यांच्या कर्तृत्त्वाची ते सराहना करतात. अर्जुन डांगळे ह्यांचा ध्यास आणि ध्येयवाद आंबेडकर विचारसृष्टीचा वाहक असल्याने त्यांची लेखनशैली स्वतंत्र आणि समतोल असल्याची प्रचिती येते. 'निळे अधोरेखित' ही त्याची साक्ष आहे (गंगाधर पानतावणे:२००५:१२)*

गंगाधर पानतवणे यांनी *निळे अधोरेखित* या ग्रंथासंबंधी केलेले हे निवेदन एकूण डांगळे यांच्या विचारदृष्टीवर प्रकाश टाकते. डांगळे यांची आंबेडकरी तत्त्वज्ञानाशी असलेली बांधिलकी स्पष्ट होते. साचेबद्ध मराठी साहित्याला नाकारणाऱ्या आणि त्यासाठी नव्या मूल्यव्यवस्थेचा आरंभ करणाऱ्या या विचारवंताबद्दल असे वाटणे साहजिकच आहे. सदर लेखसंग्रहातील *आपली संस्कृती : एक माणूस-एक मूल्य* या लेखामधून डांगळे यांनी संस्कृती म्हणजे नेमके काय? त्याचे प्रदुषण कशा प्रकारे केले गेले? यावर भाष्य केले आहे. एकूण संस्कृतीकडे ते कसे पाहतात याबद्दलची भूमिका ते या लेखात विशद करतात. वैचारिक व नैतिक विधायक कृती म्हणून ते संस्कृतीकडे पाहतात. नवी मूल्यप्रणाली, प्रागतिकता, विज्ञाननिष्ठा याप्रकारची संस्कृती त्यांना अपेक्षित आहे.

*आंबेडकरी चळवळीच्या अस्तित्वाला लागलेलं प्रश्नचिन्हं कोण मिटवणार?* या लेखातून ते आंबेडकर चळवळीची सद्यःकालीन परिस्थिती चित्रित करतात. ज्या समाजाची या संस्कृतीत *माणूस* म्हणून दखल घेतली जात नव्हती अशा जनसमूहाला बाबासाहेब आंबेडकरांनी माणूसपण प्राप्त करून दिले. स्वतःचा आवाज दिला. नरकमय आणि जीवघेण्या यातनांतून बाहेर काढून माणूसपणाचे जगणे अनुभवायला दिले. यासाठी त्यांनी चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश, भूमीहीनांचा देशव्यापी सत्याग्रह केला. पण आज ती बांधिलकी जपणारे कार्यकर्ते काय करतात? साहित्य-संस्कृतीचा विचार करणारे आजचे साहित्यिक आपण भूतकाळात कसे जगलो? हे विसरून नामांतरवादात म्हणजे दलित साहित्याला दलित साहित्य म्हणायचं की फुले-आंबेडकरवादी साहित्य म्हणायचं की बौद्ध साहित्य या वादात गुरफटून गेलकेले आहेत. ज्या बुद्धाचे तत्त्वज्ञान आत्मसात करून समाजात जगत आहोत. त्याचाच विसर पडत आहे. एकूणच काय तर

*लोकशाही धर्मनिरपेक्ष मूल्यांच्या जागी हिंदुत्त्व आणि हिंदू संस्कृतीच्या नावाखाली पुन्हा एकदा निखालस प्रतिगामी मूल्यांचा प्रसार अंत्यत सोज्वळ आणि पद्धतशीरपणे करत आहे* (अर्जुन डांगळे : २००५ : १९)

सामाजिक चळवळीची चिकित्सा ते याठिकाणी करतात. आपल्या अनुयायांनी, कार्यकर्त्यांनी हे रचनाचक्र उलटे कसे फिरवले आहे. बाबासाहेबांचा दैदिप्यमान इतिहास त्यांचे अनुयायीच पुसून टाकत आहेत. कर्तबगारीचा इतिहास लोप पावत आहे. यावर ते भाष्य करतात. *आमच्या इतिहासातील तेजस्वी पान : स्वतंत्र मजूर पक्ष* या लेखातून त्यांनी आंबेडकरांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र मजूर पक्षाची थोडक्यात वाटचाल सांगितली आहे.

*अस्मितादर्श* या त्रैमासिकाने दलित साहित्याच्या वाटचालीत मोलाचे योगदान दिले आहे. त्या अनुषगांने *अस्मितादर्श : दलित साहित्य चळवळीचा आधारवड* या लेखात त्यांनी अस्मितादर्शच्या योगदानांची चर्चा केली आहे. वाङ्मयीन वाटचालीत अस्मितादर्शचा मोलाचा वाटा आहे. १९६७ साली स्थापन झालेल्या या त्रैमासिकाने दलितांच्या दुःखाला वाचा फोडण्याचे कार्य केले. वाङ्मयीन क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली. त्याचा आलेख ते याठिकाणी घेतात. डांगळे आपल्या साहित्यात स्त्रियांना महत्त्वाचे स्थान देतात. त्यांच्या कथा, कविता आणि वैचारिक लेखनातूनही स्त्रियांबद्दलचा प्रागतिक विचार व्यक्त झाला आहे. या आदरापोटी ते *ज्यांनी घडविला इतिहास त्या भविष्यही घडवू शकतात* हा लेख लिहिला आहे. या लेखात बाबासाहेबांच्या प्रेरणेने ज्या स्त्रियांनी आंबेडकरी चळवळीत सहभाग घेतला त्यांच्या कामगिरीची दखल घेतली आहे. बाबासाहेबांनी जे सत्याग्रह केले त्या प्रत्येक सत्याग्रहात स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणात दिसून येतो. आजही दलित समाजातील महिला प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत. आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांनी इतिहास घडविला; पण सध्या मात्र स्त्रियांचा सहभाग प्रखरपणे जाणवत नाही. त्यामुळे ज्या स्त्रियांनी इतिहास घडविला त्या भविष्यही घडवू शकतात या आशयाचे चिंतन प्रस्तुत लेखात केले आहे.

*बहुजनवाद : किती वास्तव किती भ्रामक* हा लेख याठिकाणी महत्त्वाचा ठरतो. डांगळे याठिकाणी आत्मचिकित्सा करतात. त्यातून समकालीन राजकीय घडामोडींवरचे भाष्य करतात. एका अर्थाने ही बहुजनवादाची चिकित्साच आहे. बहुजन म्हणजे नेमके कोण? बुद्धापासून ते आजपर्यंत या शब्दाच्या कोणकोणत्या छटा तथा सांस्कृतिक आणि राजकीय संदर्भ आले आहेत हे डांगळे यांनी या लेखातून स्पष्ट केले आहे. या दृष्टीने या लेखाला एक वेगळे संशोधनमूल्य लाभले आहे. आज बहुजन शब्दामुळे अनेकांना प्रतिष्ठा, राजाश्रय, सत्ताश्रय मिळतो तरीही अजून बहुजनवाद तत्त्वज्ञान होऊ शकलेले नाही. डांगळेंनी यावर नेमकेपणाने बोट ठेवलेले आहे. म्हणूनच

बहुजनवादाला सामाजिक व सांस्कृतिक परिप्रेक्ष्य असलेले तत्त्वज्ञान हवे आहे असे त्यांचे मत आहे. त्यांच्या मते, *बहुजनवर्ग सर्रास ब्राह्मणी परंपरा स्वीकारून अगदी त्यांच्या सारखाच जगू पाहतोय* (अर्जुन डांगळे : २००५ : ५५) हा विसंवाद समर्थनीय आहे का? असा त्यांचा सवाल आहे. आणि तो निरूत्तर करणारा आहे. हिंदू धर्माला धक्का न लावता किंवा ब्राह्मणवादाला छुपेपणाने स्वीकारून *बहुजनवाद* जगता येणार नाही. निर्मळ बुद्धिवाद स्वीकारल्याशिवाय बहुजनवादाला अर्थ नाही ही डांगळे यांची भूमिका आहे. डांगळे यांनी वाङ्मयविषयक चिंतन *साहित्यिक, विचारवंत आणि सामाजिक बांधिलकी* या लेखातून मांडले आहे. साहित्यिकांनी वा विचारवंतानी समाजातील घटितांकडे तटस्थपणे पाहू नये अशी त्यांची धारणा आहे. अन्याय, अत्याचार, शोषण यांचा अंत कागदी ठरावातून होत नाही तर तो एकत्र येऊन करायचा असतो. काही विचारवंत अलिप्तपणे आम्हाला जे वाटते ते आम्ही लिहू असे विधान करतात तेव्हा डांगळे म्हणतात,

> *विचारवंत, साहित्यिक हा मुक्त असतो ही भाकडकथा आहे. तो मुक्तपणे लिहिणारा असला तरी त्याला सामाजिक बांधिलकीचे भान असावे.* (अर्जुन डांगळे : २००५ : ५५)

साहित्यिकांनी आणि विचारवंतानी चळवळीला योग्य ती दिशा द्यावी. आणि त्यासाठी परिवर्तनवाद हीच खरी दिशा आहे. एका अर्थाने वाङ्मयासंबंधी समाजनिष्ठ जीवनवादी भूमिका आहे याशिवाय त्यांचे *निळी पहाट, दलितांच्या एकजुटीचा नवा पर्याय, गांधी-आंबेडकर वैचारिक समन्वय, आतंकवाद : राष्ट्रीय प्रश्न* इ. लेख याठिकाणी महत्त्वाचे ठरतात. *डॉ. बाबासाहेब आंबेडरांची भाषणे* या लेखात १९२० ते १९३६ या कालखंडात बाबासाहेबांनी जी भाषणे दिलीत त्याचा संक्षिप्त आढावा घेतला आहे. आंबेडकरांच्या विचारांचे पैलू तसेच या कालखंडातील त्यांच्या वैचारिक प्रवासाचे टप्पे व दिशांचे स्वरूप स्पष्ट केले आहे. आंबेडकरांच्या दृष्टीने राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रात कोणत्या गोष्टींना संधी मिळणे गरजेचे आहे. हे सांगून स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मूल्यांचा स्वीकार करून मनुष्य मात्राचा विकास कसा होईल याविषयीचे भाष्य डांगळे करतात.

एकूणच डांगळे आपल्या विचारांचे एकसूरी प्रदर्शन न करता धर्मनिरपेक्षतावादी व विवेकनिष्ठ प्रागतिक विचारांची मांडणी करतात. डांगळे यांचे सामाजिक विषयावरचे हे लेखन आहे. समकालीन सामाजिक, राजकीय जीवनावरचे हे भाष्य आहे. संस्कृतीविषयीचे हे चिंतन आहे.

### *३. १९७० नंतरच्या दलित चळवळीचा दस्ताऐवज : दलित विद्रोह*

*दलित विद्रोह* हा अर्जुन डांगळे यांचा २००७ मध्ये प्रकाशित झालेला लेखसंग्रह. या लेखसंग्रहात एकूण २२ लेख आहेत. अर्जुन डांगळे यांनी या सर्व लेखांची *चळवळ-राजकारण, समाजवास्तव* आणि *साहित्य* अशा तीन प्रकारात वर्गीकरण करुन आपल्या वैचारिक भूमिकेची एक सूत्रबद्ध मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. रावसाहेब कसबे म्हणतात,

> *सदर पुस्तकातील लेख हे एका अर्थाने आंबेडकरी चळवळीच्या तिसऱ्या पिढीतील राजकीय आणि सामाजिक चळवळीचे मनोगतच आहे.* (अर्जुन डांगळे : २००७ :०७)

आंबेडकरी चळवळ ही भावनात्मक किंवा आक्रस्ताळी न राहता तिने समविचारी पक्ष संघटनेशी सुसंवाद साधावा. ही चळवळ केवळ दलित, आंबेडकरी अथवा जातीय न राहता ती व्यापक असावी. तिने स्वतंत्र, बलाढ्य व राजकीय ताकद म्हणून सत्तासंपादनाच्या दृष्टीने वाटचाल करावी याप्रकारची काही विचारसूत्रे डांगळे यांच्या लेखनात आढळतात. चळवळीमध्ये असताना एक कार्यकर्ता आणि साहित्याच्या संदर्भात एक विचारवंत म्हणून डांगळे आपले विचार प्रामाणिकपणे स्पष्ट करतात. सध्याची राजकीय व्यवस्था, सामाजिक चळवळीवरचे हे परखड भाष्य आहे. त्यांच्या सबंध लेखनातून आंबेडकरी चळवळीतील वैचारिक भूमिका, सामाजिक आणि राजकीय स्थित्यंतराविषयीचे विवेचन आहे. या लेखनाला राजकीय सामाजिक भूमिकेचा संदर्भ आहे. रिपब्लिकन पक्ष, दलित पँथर, रिडल्स, भाजप-सेना युती यासारख्या पक्षांचे अतंर्गत आणि राजकीय संघर्षावरील बरेचसे लेख *दलित विद्रोह* मधून पहायला मिळतात. पुस्तकाच्या शीर्षकावरूनच बऱ्याचशा गोष्टी लक्षात येतात. एक प्रकारे दलित चळवळीत काम करणाऱ्या तरुणांने आपल्या मनातला विद्रोहच मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

अर्जुन डांगळे यांनी सदर पुस्तकातील लेखांचे *चळवळ आणि राजकारण, समाजवास्तव आणि साहित्य* या विभागात प्रकारात वर्गीकरण केले आहे. *चळवळ आणि राजकारण* या पहिल्या विभागात राजकारण आणि चळवळीबद्दलची चर्चा केली आहे. दलितांनी बौद्ध धम्म स्वीकारल्यामुळे गुलामगिरी नष्ट झाली. मात्र त्यांचे भौतिक प्रश्न सुटले नाहीत. हे भौतिक प्रश्न सुटण्यासाठी *नवी दिशा, दृष्टी हवीच* हा लेख लिहिला आहे. आंबेडकरांचे महानिर्वाण होण्याआधीची चळवळ आणि आजची दलित चळवळ यामध्ये होत गेलेले बदल अन् त्यावर पुन्हा एकत्र येण्यासाठी आवश्यक गोष्टी याचे विवेचन *बाबासाहेब आणि आजची चळवळ*मधून दिसून येते. रिपब्लिकन पक्ष केवळ दलित प्रश्नांशी संबंधित नाही तर देशातील लोकशाही, समाजवाद, राष्ट्रीय एकात्मता या मूल्यांशी निगडित आहे. आणि तो कसा याविषयी *सम्यक समाज आंदोलन : निर्मिती आणि वाटचाल* व *पक्षाची पुर्नबांधणी कशासाठी?* यामधून डांगळे सांगतात. भारतात

आंबेडकरी विचारधारेला माणनारे खूप कायकर्ते आहेत. आंबेडकरी विचारातील धार आणि झेप कार्यकर्त्यांच्या विचारविश्वातही आहे. आजपर्यंत दलित जनतेने अनेक लढे देऊनही त्यांचे असंख्य प्रश्न अनिर्णित अवस्थेत आहेत. शोषित जनता त्याच प्रवाहात अडकून आहे. दिवसेंदिवस त्यांचे प्रश्न वाढत जात आहेत. हे प्रश्न सोडविण्यासाठी आंबेडकरांसारखे उत्तुंग व्यक्तिमत्त्व असणारा एखादा दलित नेता या जनतेने शोधला पाहिजे. त्याला पाठिंबा दिला पाहिजे. डांगळे म्हणतात,

> *राजकीय लोकशाहीचे रुपातंर सामाजिक लोकशाहीत करावयाचे असेल तर सत्ता हस्तगत केल्याशिवाय आंबेडकरी चळवळीला पर्याय नाही.* (अर्जुन डांगळे :२००७ :२४)

हाच पर्याय ते निवडतात. समकालीन दलित चळवळीचा सामाजिक, राजकीय इतिहास मांडण्याचा प्रयत्न *अयोध्याकांड : आंबेडकरी दृष्टिकोण* या लेखात करतात. डिसेंबर १९९२. अयोध्येतील जी बाबरी मशिद पाडण्यात आली त्याला हिंदूत्त्ववादीच जबाबदार होते. या घटनेमध्ये कार्यरत असणाऱ्या संघटना आणि भारतीय हिंदूत्ववाद्यांनी केलेले हे वाईट आणि चिंताजनक कृत्य यावर डांगळे भाष्य करतात. हिंदूनी पक्षांच्या भुलभुल्लैयाला बळीं न पडता स्वतःच्या पायावर उभे रहावे असे आवाहन डांगळे या विभागात करतात.

*समाजवास्तव* या दुसऱ्या विभागात समाजातील वास्तवजीवनाचे रूप ते प्रकट करतात. धर्मांतर आणि समाजपरिवर्तन म्हणून आंबेडकरांनी धर्मांतर का केले याचे स्पष्टीकरण ते देतात. धर्मांतरामुळे दलित ज्या मानसिक गुलामगिरीत सापडला ती नष्ट करण्याकरिता त्यांनी बुद्ध धर्म स्वीकारला. धर्मांतरामुळे मानसिक परिवर्तन झाले. पण त्याचबरोबर सामाजिक परिवर्तन होणे महत्त्वाचे आहे. सामाजिक परिवर्तन व्हायचे असेल तर ते आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय या सर्व बाजूने होणे डांगळे यांना अपेक्षित आहे. ते कसे याचे विवेचन ते प्रस्तुत लेखात देतात. हे समाजवास्तव बदलण्यासाठी आंबेडकरी चळवळीने अनेक प्रयत्न केले आहेत. त्यातील एक म्हणजे आंबेडकरी जलसे होय. त्याचे कार्य कसे होते त्यासंदर्भात *आंबेडकरी जलसे : स्वरूप व कार्य* हा लेख महत्त्वाचा ठरतो.

समाज हा गतीशील असतो. काळानुसार तो बदलत असतो. तो जुन्या गोष्टी बाजूला सारतो. नव्याचे स्वागत करतो. दलित समाजाने पण हे धोरण स्वीकारले आहे. *महाराष्ट्रातील बदलता दलित तरुण* मधून हे बदल डांगळे सांगतात. आंबेडकरी चळवळ, रिपब्लिकन पक्ष, दलित पँथर यासारख्या चळवळींमुळे तरुणांच्या मनातील सामाजिक भावना प्रबळ होत गेली. आपल्या समाजाच्या बदलासाठी तो जी आव्हाने स्वीकारत होता याचे जीवंत अनुभव या लेखातून दिसतात. शिवाय वर्णलढ्याशी आणि वर्गलढ्याशी सांगड *वास्तवाला सामोरे जायलाच हवे* मधून प्रकट होते. दलित मनातील विद्रोहाचा आविष्कार या कार्यकर्त्याच्या लेखणीतून दिसून येतो.

*साहित्य* या तिसऱ्या विभागात दलित तरुणांनी वेदनेतून आणि विद्रोहातून साहित्य लिहिले. त्यावर काही परिक्षणवजा लेखांचा समावेश करण्यात आला आहे. नामदेव ढसाळांच्या *गोलपिठा* या कवितासंग्रहावर सर्वांत पहिले परिक्षण अर्जुन डांगळे यांनी लिहले आहे. गोलपिठ्यातून जे जे विश्व साकार झाले त्यापाठीमागे कोणती कारणे होती याचा विचार *गोलपिठा : दलितांच्या ठणकत्या वेदनांचा स्फोटक आविष्कार* मधून चित्रित केला आहे. शोषित, पिडित आणि उपेक्षित जीवनाचा आविष्कार प्रकाश जाधव यांच्या *दस्तखत* कवितासंग्रहाने केला. या कवितासंग्रहावरती लिहलेल्या परिक्षणाचा समावेशही याठिकाणी केला आहे. शिवाय एकूणच मराठी दलित कवितेचा आढावा *दलित कवितेतील विद्रोह* मधून आला आहे. *साहित्यिक दृष्टिकोण व साहित्यनिर्मिती* या मुलाखतीतून मराठी साहित्य व समाजमनाचे नाते, दलित साहित्याचे वेगळेपण, त्यातील उणिवा, साहित्यिकांचे राजकारणाबद्दल असलेल्या प्रतिक्रिया, राजकीय पक्षांच्या भूमिका आणि एकूणच समतेच्या लढ्याबद्दलची चर्चा करण्यात आली आहे. शेवटी दलित साहित्याचा विकास आणि भवितव्यावर दीर्घ अशी व्यापक चर्चा करण्यात आली आहे.

### ४. ***जीवनरूपी समरांगणातील योद्ध्यांचे स्मरण : मैदानातील माणसे***

*मैदानातील माणसे* हा अर्जुन डांगळे यांचा व्यक्तिचित्रणात्मक लेखसंग्रह सुगावा प्रकाशनच्या वतीने २००४ मध्ये प्रकाशित करण्यात आला. हे लेख २००३ मध्ये *आपलं महानगर* या मुंबईहून प्रसिद्ध होणाऱ्या सांय-दैनिकांतील *भावकी* या साप्ताहिक सदरात लिहिले गेले आहेत. या सर्व व्यक्तिरेखा आंबेडकरी चळवळीशी संबंधित आहेत. त्या लेखांचा संग्रह म्हणजे *मैदानातील माणसे.* असामान्य स्वरूपाचे कार्य करणाऱ्या व्यक्तीवरचे हे लेख आहेत.

प्रस्तुत लेखसंग्रहाचे शीर्षकच अर्थपूर्ण आहे. *मैदानातील माणसे* या दोन शब्दातून त्यांच्या व्यक्तिरेखांच्या संघर्षमय जीवनाची कल्पना येते. मैदान याचा अर्थ रणांगण. या सामाजिक जीवनाच्या रणांगणात स्वबळावर युद्ध करून झगडणारे सैनिक म्हणजेच *मैदानातील माणसे* आहेत. स्वतःच्या व्यक्तिगत आयुष्याचा विचार न करता आपल्या समाजासाठी आणि समाजबांधवासाठी ज्यांनी आपले जीवन पणाला लावले. त्यांच्या सुखासाठी स्वतःला झोकून दिले अशी ही माणसे आहेत. या व्यक्तींच्या मृत्यूनंतर लिहिलेले हे लेख आहेत.

प्रस्तुत ग्रंथात एकूण १५ लेख आहेत. सदरचा लेखसंग्रह हा व्यक्तिचित्रणात्मक स्वरूपाचा आहे. यात सामाजिक नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि लेखक कलावंताचा समावेश आहे. *भाई अनंत चित्रे, कॉ. भास्करराव जाधव, कॉ.हरी जाधव, दादासाहेब रूपवते, जे.डी.जाधव, घनश्याम तळवटकर, कॉ.आर.बी.मोरे, शांताबाई दाणी, चांगदेवराव खैरमोडे, सुरबानाना टिपणीस, दादू इंदूरीकर, प्र.श्री.नेरूरकर, अण्णा भाऊ साठे, दया पवार, वि.वि.भट* इ. व्यक्तींच्या कार्याचे स्मरण

या लेखनात आहे. या व्यक्तींची जडघडण, त्यांच्या सामाजिक व वाङ्मयीन कार्याची ओळख या लेखात आहे. भूमीहीनांचा सत्याग्रह, कामगार मजूर पक्षाची स्थापना, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश, मनुस्मृती दहन, धम्मदीक्षा या प्रत्येक सत्याग्रहाच्या वेळी जो जनसमुदाय उपस्थित होता त्या जनसमुदायातील महत्त्वाच्या व्यक्तींच्या कार्याविषयीचे हे विवरण आहे.

राजकारण, समाजकारण, अर्थकारण, यासारख्या प्रवाहातील आयुष्य जगताना या व्यक्तींना ज्या समस्यांना सामोरे जावे लागते. जी संकटे सहन करावी लागतात. समाजाचा आपल्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण काय असतो. चळवळीतील माणूस म्हणून समाज आपल्याबद्दल कोणती भूमिका मनात ठेवून असतो. या सर्व गोष्टींबद्दलचा विचार डांगळे याठिकाणी करतात.

कला, साहित्य, राजकारण, शिक्षण, या क्षेत्रातील व्यक्तींच्या कामगिरीचीही दखल डांगळे घेतात. क्रांतीकारक विचारशैली बाळगून ही मैदानातील माणसे आयुष्यभर संघर्षाला तोंड देतात. मानवी मूल्यांची जोपासना करून सर्वांना समान स्थान मिळावे म्हणून झगडणारी ही माणसे आहेत.

अर्जुन डांगळे यांना कॉलेजजीवनाच्या वाटचालीत अनेक नामंवत आणि कर्तृत्ववान व्यक्तींचा सहवास लाभला. १९६३ मध्ये ते जेव्हा सिद्धार्थ कॉलेजमध्ये होते तेव्हा त्यांची भेट राजकीय चळवळीविषयी सर्तक असणारे घनःश्याम तळवटकर यांच्यासोबत घडून आली. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन कलेले सिद्धार्थ कॉलेजच्या पहिल्या तुकडीतील ते पहिले पदवीधर होते. आंबेडकर चळवळीतील बुद्धीजीवी वर्ग तयार करणारे प्रवक्ते म्हणून तळवटकरांना ओळखले जात होते. त्यांच्या जीवनकार्याविषयीची माहिती प्रस्तुतच्या लेखात डांगळे यांनी सांगितली आहे. आयुष्यभर अविवाहित राहून कुणालाही न भिता, न डगमगता दलित पँथरसारख्या चळवळीला पाठिंबा देण्याचे काम शांताबाई दाणी सारख्या व्यक्तीने केले. त्यांच्या कार्याचे वेगळेपण डांगळे शोधतात.

*मैदानातील माणसे* मधील सर्व व्यक्तींचे आपल्या क्षेत्रात स्वतःचे एक स्वतंत्र अस्तित्व आहे. स्वतंत्र वेगळेपण आहे. ध्येय्य, जिद्द, चिकाटी आणि कष्ट करून जगणारी ही माणसे आहेत. स्वतः घडत घडत इतरांचे आयुष्य घडवणारी ही माणसे आहेत. पुरोगामी विचारांचे साहित्यिक आणि सांस्कृतिक चळवळीशी बांधिलकी जपणारी आहेत. सर्वसामान्य दलित कष्टकरी जनतेशी बांधिलकी मानून त्यांच्यासोबत जगणारी ही माणसे आहेत. या सर्व महान माणसांशी डांगळे यांचा जवळचा संबंध होता. त्यांच्या आदरापोटी आणि त्यांच्या कार्याची ओळख वाचकांना व्हावी या उद्देशाने त्यांच्या हातून हे लेखन घडले आहे.

एकूणच अर्जुन डांगळे यांचा व्यक्तिचित्रणात्मक लेखसंग्रह हा वैशिष्ट्यपूर्ण असा आहे. आयुष्यभर समाजकार्यासाठी वाहून घेणाऱ्या या *मैदानातील माणसां*च्या कार्याची ओळख समाजाला व्हावी या उद्देशाने डांगळे यांनी हे लेखन केले आहे. मृत्यूपर लेखनातून सामाजिक चळवळीत आघाडीवर कार्यरत असणाऱ्या नेत्यांच्या कार्यकर्त्यांच्या कार्याचे हे स्मरण आहे.

## *अर्जुन डांगळे यांचे संपादन कार्य*

अर्जुन डांगळे यांनी सहकाऱ्यांच्या वतीने एकूण चार पुस्तकांची संपादने केली आहेत. यामध्ये दलित साहित्याबरोबरच भूमिका स्पष्ट करणारे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या जीवनकार्यासंबंधीचे गौरवग्रंथ आहेत.

### *१. दलित साहित्यः एक अभ्यास*

*दलित साहित्य : एक अभ्यास* हा ग्रंथ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने १९७८ मध्ये प्रकाशित केले. मराठी दलित साहित्यातील वैचारिक व संदर्भग्रंथ म्हणून महत्त्वाचे असे हे पुस्तक आहे. साधारणतः साठनंतरच्या काळात दलित साहित्याचा प्रवाह उदयाला आला. या प्रवाहाला दलित साहित्य म्हणावे का? दलित साहित्याची गरज आहे का? यासारखे अनेक वाद निर्माण झाले होते. परंतु शेवटी दलित साहित्याने आपले स्वतःचे अस्तित्व निर्माण केले. इतर साहित्यापेक्षा आपले वेगळेपण सिद्ध करून दाखवले. त्यातूनच दलित साहित्याची निर्मिती झाली. आपल्या वाट्याला आलेले दाहक जीवनानुभव या साहित्यातून व्यक्त होत गेले. दलित समाज जे जीवन जगू लागला तेच त्यांने आपल्या साहित्यातून मांडायला सुरवात केली. याला वैचारिक तत्त्वाची बैठक मिळून दलित साहित्य हा प्रवाह पुढे विकसित होत गेला.

अर्जुन डांगळे यांनी संपादित केलेला प्रस्तुतचा ग्रंथ दलित साहित्याच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचा वाटतो. सदर ग्रंथाबद्दल वेगवेगळ्या पद्धतीने चर्चाही झाली आहे. प्रस्तुतच्या ग्रंथात डांगळे यांनी महाराष्ट्रातील प्रमुख समीक्षक व विचारवंत यांच्याबरोबर दलित साहित्यातील प्रेरणा, त्याची सामाजिक व वाङ्मयीन उद्दिष्टे, त्याच्या मूल्यमापनाचे निकष इ. प्रश्नांची वेळोवेळी जी चर्चा केली आहे त्या चर्चेतील निवडक लेखांचा व भाषणांचा समावेश केला आहे. त्यामुळे या ग्रंथाला अनेक अभ्यासकांचे दलित साहित्याबद्दलचे विविध दृष्टीकोण लाभले आहेत. तसेच या ग्रंथाला सामाजिक व वाङ्मयीनदृष्ट्या महत्त्व फार आहे. नव्या जीवनवादी वाङ्मयाचा पुरस्कार करणाऱ्या साहित्यप्रवाहासंबंधीचा लेखाजोखा या लेखात आहे.

प्रस्तुत ग्रंथात डांगळे यांनी दलित साहित्याचा आढावा घेणारे, दलित साहित्यातील अनेक प्रवाह, उपप्रवाहांचे स्वरूप स्पष्ट करणारे, त्यांच्यामागील प्रेरणांचे विश्लेषण करणारे त्रेचाळीस

पानांची दीर्घ आणि अतिशय उपयुक्त ठरणारे निवेदन जोडले आहे. चळवळीचा कार्यकर्ता व एक विचारवंत म्हणून त्यांची वैचारिक दृष्टी या निवेदनावरून आपल्या लक्षात येते.

दलित साहित्याच्या निर्मिती व प्रेरणास्थानासंबंधाचा मराठीत विविध अंगानी विचार झाला आहे. भगवान बुद्धापासून चोखामेळा, मार्क्स ते म.फुल्यापर्यंत या प्रेरणा शोधल्या गेल्या आहेत. डांगळे हे दलित साहित्याचे उगमस्थान हे बाबासाहेब आंबडेकरांच्यापासून शोधतात. बाबासाहेबांचे विचार, त्यांची जीवनदृष्टी, त्या अनुषंगाने त्यांनी केलेल्या चळवळी, नवे विचार, विज्ञानयुग या सर्वांमध्ये ते दलित साहित्याचे बीज शोधतात. दलित साहित्याचे विशेष स्पष्ट करताना ते

> *सामाजिक क्रांती करू पाहणाऱ्या एका बंडखोराकडे दलित साहित्याचे जनकत्व जावे हाच दलित साहित्याचा लक्षणीय विशेष आहे* (अर्जुन डांगळे : १९७८ : ०२)

असे सांगतात. त्यांना सामाजिकता आणि विषमतेविरूद्ध बंड उभारून नव्या जगाची निर्मिती करणे हा दलित साहित्याचा मुख्य पैलू वाटतो. सदर काही मुद्यांचा आढावा घेत असताना आंबेडकरांच्या जीवनकार्याचा यासदंर्भात त्यांनी आढावा घेतला आहे.

डांगळे यांच्या मते, दलित साहित्यातील पहिले महान लेखक म्हणजे अण्णा भाऊ साठे. कारण दलित जीवनाचे समर्थ असे चित्रण त्यांच्या साहित्यातून येत गेले. अण्णा भाऊच्या साहित्याची वैशिष्ट्ये त्यांनी याठिकाणी नमूद केली आहेत. अण्णा भाऊ बरोबरच ते बाबुराव बागूल यांनाही महत्त्व देतात. बागुलांच्या *जेव्हा मी जात चोरली होती* या कथासंग्रहाने मराठी साहित्य विश्व हादरून टाकले होते. आपले अनुभव पेलण्याची ताकद व त्याला सर्जनशील आकार देण्याचे काम या कथासंग्रहाने केला. दलितांची वेदना त्यांनी बोलकी करून टाकली. तिथूनच दलित कथासाहित्य खऱ्या अर्थाने नावरूपाला आले.

प्रस्तुत प्रस्तावनेत डांगळे यांनी लिटल मॅगझीन चळवळ आणि पुरोगामी साहित्य चळवळ या दोन साहित्यप्रवाहाविषयी चर्चा केली आहे. महाराष्ट्रातील स्वातंत्र्योत्तर काळातील दोन महत्त्वाच्या चळवळीची चिकित्सा केली आहे. मराठी साहित्याची परंपरा ही ज्ञानेश्वरांपासून किंवा त्याआधीपासून सुरु झाली आहे. परंतु डांगळे जेव्हा दलित साहित्याची परंपरा शोधतात तेव्हा बाबासाहेब आंबेडकरांनाच उगमस्थान मानतात आणि तिथूनच दलित साहित्याची परंपरा मानतात. हे डांगळे यांचे मराठी साहित्याच्या इतिहासातील वेगळे आणि महत्त्वाचे निरिक्षण आहे.

*कलेची स्वायत्तता* आणि *परंपरेला संपूर्ण नकार, महाराष्ट्रातील आज उद्याचा सांस्कृतिक संघर्ष आणि वाङ्मयीन समस्या, दलितांचे साहित्य-जाणीवा, प्रवृत्ती आणि प्रेरणा* याविषयावर या ग्रंथात चर्चा केली आहे. जीवननिष्ठ साहित्याचे, संकल्पनांचे प्रारुप मांडण्याचा हा प्रयत्न आहे.

तसेच समीक्षकांनी लिहलेले लेख, दलित साहित्य संमेलनात झालेली अध्यक्षीय भाषणे या ग्रंथात समाविष्ट करण्यात आली आहेत.

### २. *डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ*

*डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ* हा ग्रंथ आंबेडकरांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने १९९३ मध्ये प्रसिद्ध केला. हा ग्रंथ *दया पवार, अर्जुन डांगळे, केशव मेश्राम, वामन निंबाळकर, एस.एस.भोसले, बा.ह.कल्याणकर* आणि *हरि नरके* यांनी मिळून संपादित केला आहे. या संपादित ग्रंथातून ज्ञानोपासक वृत्तीशी सुसंगत असा दृष्टिकोण ठेवून आंबेडकरांच्या जीवनकार्यांचे आणि त्यांनी केलेल्या कामगिरीचे मूल्यमापन केले आहे. समाज, राजकारण, धर्म, राज्यघटना, अर्थकारण, शिक्षण यासारख्या अनेक विषयांवर बाबासाहेबांनी चिंतन आणि मनन केले. त्यांचे आकलन व विश्लेषण करण्यास उपयुक्त असे ४० निबंध या ग्रंथात समाविष्ट आहेत.

प्रस्तुत ग्रंथात आंबेडकरांचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक चिंतन आणि वाङ्मयीन विचार यावरील वैशिष्ट्यपूर्ण असे लेख आहेत. याशिवाय आंबेडकरांची लेखनशैली, विनोद, पत्रकारिकता, दलित साहित्याचे प्रेरणास्त्रोत या विषयावरच्या लेखनाचा आढावा घेतला आहे. राखीव जागेचा प्रश्न, स्वातंत्र्यपूर्वकाळातील दलित चळवळ, कामगार विषयक धोरण, स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन, आंबेडकरांचे समकालीन, आंबेडकरांचे जीवनकार्य व तत्त्वज्ञान या सर्व गोष्टींचा नव्याने शोध घेण्याचे प्रयत्न या ग्रंथात करण्यात आला आहे. आंबेडकरांचे शिक्षणविषयक तत्त्वज्ञान, शिक्षणविषयीचे कार्य आणि त्याबद्दल त्यांचा असणारा दृष्टिकोण बाबासाहेब आंबेडकरांची वैचारिकता, त्यांची लेखनशैली, विनोद, पत्रकारिकता, त्यांचे विरोधक, त्यांच्या विचारांचे सूत्र या ग्रंथातून प्रकट झाले आहे. संतसाहित्याबद्दलची त्यांची भूमिका, फुले मार्क्स यांचा संयोगवाद, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, सावरकर आणि बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार इथे मांडले आहेत. दलित साहित्याचे प्रेरणास्त्रोत म्हणून आंबेडकरांचे योगदान कसे ठरले. त्यांच्या अस्मितेच्या स्पृश्यवर्गाला कितपत साक्षात्कार झाला. आदी विषयांचा विचार प्रस्तुत ग्रंथात करण्यात आला आहे.

### *३.लोकशाहीर आण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय*

प्रस्तुतचा संपादित ग्रंथ हा महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने १९९९ मध्ये प्रकाशित करण्यात आला सदर ग्रंथ *अर्जुन डांगळे, नीता उपाध्ये, वसुंधरा पेडसे* व *डॉ. सुभाष सावरकर* इ. च्या सहाय्याने हा ग्रंथ प्रकाशित करण्यात आला आहे. ग्रंथाचे एकूण तीन भाग



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आहेत. पहिल्या भागात अण्णा भाऊ साठे यांचे पोवाडे, लावणी, नाटक, लोकनाट्य आणि प्रवासवर्णने यांचा समावेश केला आहे. दुसऱ्या भागात त्यांच्या *कथा* तर तिसऱ्या भागात *कादंबरीचा* थोडक्यात आढावा घेऊन शेवटी काही परिशिष्टे देण्यात आली आहेत.

या ग्रंथात त्यांच्या एकूण साहित्यापैकी *निवडक लावण्या व पोवाडे, एक नाटक, १० लोकनाट्ये एक प्रवासवर्णन, २३ कथा* व ५ *कादंबऱ्यां*चा आढावा घेण्यात आला आहे.

प्रस्तुत ग्रंथाच्या प्रस्तावनेत अर्जुन डांगळे यांनी अण्णा भाऊंच्या जीवनप्रवासाचा आढावा घेतला आहे. अण्णा भाऊ साठे वाटेगावहून मुबंईपर्यंत आले. लेबर कॅम्पात स्थायिक झाले. तिथून त्यांचा प्रवास घडत गेला. याचे विवेचन डांगळे यांनी या प्रस्तावनेतून केले आहे. अण्णा भाऊंनी विपुल आणि बहुविध साहित्यनिर्मिती केली. साहित्यनिर्मितीमागील काही विचारसूत्रे त्यांनी इथे मांडली आहेत.

अर्जुन डांगळे हे अण्णा भाऊंच्या जीवनाचे एकूण चार टप्पे मानतात. पहिला म्हणजे वारणेच्या खोऱ्यात, डोंगरदऱ्यात वाढलेले अण्णा भाऊ, दुसरा वाटेगावहून मुबंईला पायी चालत आलेले, पोटापाण्यासाठी नोकरीधंदा शोधणारे अण्णा भाऊ. तिसरा मार्क्सवादी विचारधारा स्वीकारून पददलित, शोषित जनतेसाठी आपली लेखणी झिजविणारे, फकिरासारखी कादंबरी लिहणारे, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात अमर शेख, गव्हाणकर यांच्यासह उभा महाराष्ट्र ढवळून काढणारे अण्णा भाऊ. आणि चौथा म्हणजे कम्युनिस्ट चळवळीचा भर ओसरल्यानंतर ते मृत्यूपर्यंत जगलेले अण्णा भाऊ. असे त्यांच्या जीवनाविषयीचे एकूण चार टप्पे केंद्रवर्ती ठेवून त्यांच्या लेखनकार्याचा व जीवनकार्याचा विचार विचार मांडला आहे. एकूणच डांगळे यांना अण्णा भाऊ जसे समजले तसे त्यांनी याठिकाणी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते समाजवास्तवाची जाण असणाऱ्या या कलावंताची ओळख संपूर्ण समाजाला व्हावी हा या ग्रंथसंपादनापाठीमागचा उद्देश आहे.

### *४. कर्मवीर दादासाहेब गायकवाड काल आणि कर्तृत्व*

प्रस्तुतचा गौरवग्रंथ दादासाहेबांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळाने २००२ मध्ये प्रकाशित केला. प्रस्तुतचा ग्रंथ अर्जुन डांगळे यांनी आपल्या सहकाऱ्यांच्यावतीने संपादित केला आहे. शैक्षणिक, वैचारिक तसेच राजकीय क्षेत्रात दादासाहेब गायकवाड यांचे योगदान लक्षणीय आहे. राजकीय क्षेत्रात त्यांचे व्यक्तिमत्व कर्तृत्वसंपन्न आहे. दलित आणि शोषित वर्गाच्या उन्नतीसाठी बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली दादासाहेबांनी अनेक चळवळी उभ्या केल्या. आंबेडकरी चळवळीला बळ देणारा एक सेवाभावी, विचारशील आणि संघटनकुशल कार्यकर्ता म्हणून कोट्यावधी जनतेच्या मनात दादासाहेबांनी आपली प्रतिमा स्थिर केली. महाराष्ट्राची जडणघडण करणाऱ्या दादासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाची, नेतृत्वाची आणि विचारांची ओळख समाजाला व्हावी. त्यांच्या कर्तृत्वाची ओळख करून देताना महाराष्ट्राचा सामाजिक इतिहासही त्यातून व्यक्त व्हावा हा या ग्रंथसंपादनामागील हेतू दिसून येतो. या ग्रंथात दादासाहेबांची मुलाखत, त्यांची भाषणे, त्यांचा पत्रव्यवहार याविषयी काही लेख आहेत. यातून सामाजिक राजकीय चळवळीचे दर्शन घडून येते. लोकप्रबोधनाचा विचार स्पष्ट होतो. सदर संपादक मंडळात *अर्जुन डांगळे, निर्मलकुमार फडकुले, रावसाहेब कसबे, उत्तम कांबळे, सदानंद रेगे* व *रमेश शिंदे* आदी व्यक्तींचा सहभाग आहे.

प्रस्तुत ग्रंथाचे एकूण तीन विभाग केले आहेत. पहिल्या विभागात दादासाहेबांच्या विविधांगी व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देणारे सुमारे २६ लेख आहेत. त्यात *सामाजिक समतेसाठी झालेल्या चळवळी, कर्मवीरांच्या अथक संघर्षाचा इतिहास, संतती नियम, आंबेडकरांचे निष्ठावान सहकारी, शिक्षणविषयक कामगिरी, जातीनिर्मुलनाच्या चळवळी, महिला उद्‌गाराचा विचार, भूमिहिनांचे आंदोलन, चवदार तळ्याचा सत्याग्रह, धार्मिक मुक्ती आंदोलन* आदी विषयातून दादासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देण्यात आली आहे. या विभागात *बाबासाहेब आणि दादासाहेब* या नावाने अर्जुन डांगळे यांचा एक लेख समाविष्ट करण्यात आला आहे. सदरच्या लेखात अर्जुन डांगळे यांनी दादासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाची व कार्याची विविधांगाने

ओळख करून दिली आहे. बाबासाहेब आंबेडकरांसोबत महाडच्या चवदारतळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश, येवला येथील ऐतिहासिक परिषद, स्वतंत्र मजूर पक्ष आणि शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना यासर्वांबाबत बाबासाहेब आंबेडकरांनी दादासाहेबांबद्दल केलेल्या विचारविनिमयाविषयीची ऐतिहासिक संदर्भ या लेखात आहेत. दादासाहेब गायकवाडांचा स्वभाव, त्यांचा असणारा ग्रामीण पेहराव, जगण्यातील अनुभवाचा सत्त्वांश घेऊन आलेली भाषा, शैलीदार भाषणे, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत रिपब्लिकन पक्षातर्फे दादासाहेबांचे योगदान, सर्वांसोबत मायेने आणि प्रेमाने वागणारे दादासाहेब. अशा अनेक विविध रूपांचा आढावा या लेखात घेतला आहे. अर्जुन डांगळे दादासाहेब गायकवाड यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर रिपब्लिकन आंबेडकरी चळवळीतील *एक सोनेरी पान* असे म्हणतात. एकूणच त्यांच्या कार्याबद्दलची माहिती डांगळे यांनी आपल्या लेखातून स्पष्ट केली आहे.

प्रस्तुत संपादित ग्रंथाच्या दुसऱ्या भागात फ.मु.शिंदे, अरुण काळे यांनी दादासाहेबांवर लिहिलेल्या कविता तसेच महाराष्ट्राचा दैदिप्यमान तारा, वीर नेता, प्रेमळ दादासाहेब, परिवर्तन लढ्याचा झुंजार सेनानी आणि महाराष्ट्राचा एक दीपस्तंभ म्हणून दादासाहेबांच्या आठवणी सांगितल्या आहेत. तिसऱ्या भागात दादासाहेबांनी स्वतः लिहिलेले लेख, मुलाखती, त्यांनी दिलेली भाषणे आणि लिहिलेली पत्रे यांचा समावेश करण्यात आला आहे. शेवटी त्यांचा एकूण जीवनपट परिशिष्टामध्ये सांगितला आहे.

**समारोप**

अर्जुन डांगळे यांचे लेखन हे प्रतिक्रियावाद व अभिप्रायात्मक स्वरूपाचे आहे. त्यांच्या वैचारिक वाङ्मयाचा अभ्यास करता त्यांची साहित्याकडे आणि समाजाकडे स्वतंत्रपणे पाहण्याची दृष्टी दिसून येते. अर्जुन डांगळे यांची झालेली जडणघडण व महाराष्ट्राच्या साठनंतरच्या सामाजिक पर्यावरण यांच्यात जवळचे संबंध आहेत. या वातावरणामुळे त्यांचा समाजाकडे आणि साहित्याकडे बघण्याचा एक व्यापक दृष्टिकोण तयार होत गेला. साहित्य, समाज आणि चळवळीकडे तटस्थपणे पाहण्याची भूमिका ते स्वीकारत गेले. प्रथमपासूनच त्यांना कम्युनिस्ट चळवळीच्या तत्त्वज्ञानाचे आकर्षण असल्यामुळे ते या चळवळीत उतरले. सामाजिक विषमतेचा त्यांच्या मनावर खोल

परिणाम झालेला दिसून येतो. या संबंध काळात त्यांच्या वाङ्मयीन जडणघडणीवर जे परिणाम होत गेले त्याचा आलेख त्यांच्या वैचारिक लेखनातून व्यक्त झाला आहे.

*निळे अधोरेखित* मधील त्यांच्या लेखनातून तत्कालीन आंबेडकरी चळवळीचा आशय व्यक्त होतो. *आंबेडकरी चळवळीचे अंतरंग* मधील त्यांच्या लिखाणातून आंबेडकरी विचाराविषयीचे एक वैचारिक सूत्र पहायला मिळते. १९७० नंतरच्या दशकातील आंबेडकरी चळवळीने जी वळणे घेतली होती. त्या काळात ज्या राजकीय, सामाजिक वा आर्थिक घटना घडत होत्या. त्यांचा वृत्तांत डांगळे आपल्या दलित विद्रोह मधून मांडताना दिसून येतात. तर मृत्यूपर लेखनातून सामाजिक चळवळीत आघाडीवर कार्यरत असणाऱ्या नेत्यांच्या, कार्यकर्त्यांच्या कार्याचे स्मरण *मैदानातील माणसे* मधून घडते.

अर्जुन डांगळे यांच्या संपादनकार्याविषयीचा आढावा घेत असताना एक समीक्षक, विचारवंत म्हणून जी तटस्थ भूमिका हवी असते ती त्यांच्या लेखनातून प्रकर्षाने जाणवते. *दलित साहित्य : एक अभ्यास* या संपादित ग्रंथामधून दलित साहित्याची वैशिष्ट्ये, वेगळेपण आणि दलित साहित्याचे मुख्य पैलू कोणते या सर्वांचे आकलन होण्याच्या दृष्टीने हा ग्रंथ महत्त्वाचा ठरतो. *लोकशाहीर अण्णा भाऊ साठे : निवडक वाङ्मय* या ग्रंथातून अण्णा भाऊंच्या साहित्यातील निवडक वाङ्मय एकत्र केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या समाज, राजकारण, अर्थकारण, धर्म, राज्यघटना, शिक्षण या विविध विषयावरचे आकलन तसेच आंबेडकरांच्या एकूण विचारांची समज *डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथातून* सर्वांना व्हावी या उद्देशाने हा ग्रंथ प्रकाशित करण्यात आला आहे. आंबेडकरी चळवळीला बळ देणारा एक सेवाभावी नेता म्हणून कोट्यावधी जनतेच्या मनात आपली प्रतिमा स्थिर करणाऱ्या दादासाहेबांच्या जीवनकार्याचा आढावा *कर्मवीर दादासाहेब गायकवाड : काल आणि कर्तृत्व* मधून घेतला आहे. या संबंध महान नेत्यांनी आपल्या समाजबांधवासाठी जे कार्य केले त्या जीवनकार्याविषयीची ओळख समाजाला व्हावी यादृष्टीने अर्जुन डांगळे व त्यांच्या संपादक मंडळाने केलेला हा प्रयत्न महत्त्वाचा वाटतो.

समाज, साहित्य, लोकजीवन, राजकारण, संस्कृती, आंदोलने हे अर्जुन डांगळे यांच्या चिंतनाचे विषय आहेत. वेगवेगळ्या नियतकालिकांतून त्यांनी आपली वैचारिक भूमिका मांडलेली



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आहे. स्वतःची वेगळी आणि स्वतंत्र शैली त्यांनी आत्मसात केली. त्यांनी लिहिलेल्या लेखसंग्रहातून १९७० नंतरच्या दशकातील आंबेडकरी चळवळीने जी वळणे घेतली होती. त्या काळात ज्या राजकीय, सामाजिक वा आर्थिक घटना घडत होत्या. त्या सर्वांची कल्पना येते. त्यांची जीवनदृष्टी बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक लोकशाहीच्या तत्त्वज्ञानातून आणि आंदोलनातून विकसित झाली आहे. त्यांच्या लेखनाची प्रक्रिया ही प्रश्नांच्या मुळांशी जाऊन आपली भूमिका स्वतंत्रपणे विशद करणारी आहे. त्यांचे लेखन हे आंबेडकरी विचारधारेशी बांधिलकी जपणारे असल्याने त्यातून ठामपणा, ठाशीवपणा आणि परखडपणा प्रतित होतो. त्यांच्या लिखाणातून आंबेडकरी विचाराविषयीचे एक वैचारिक सूत्र पहायला मिळते.